महाराष्ट्र शासन

दुरध्वनी क्रं. - 02462-244474, 234504
234720
फॅक्स क्रं. - 02462-235103

नियंत्रण कक्ष क्रं. - 02462-
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

---

जा.क्रं./ प्रेस नोट/144/पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड /2025 / दिनांक : 10/04/2025

---

# नांदेड पोलीस दलाकडून भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या अनुषंगाने सलग 18 तास अभ्यास करण्याचा उपक्रम..

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य खुप मोठे असून त्यांना खरे अभिवादन हे अभ्यासातुन देणे योग्य ठरेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे 18 तास अभ्यास करायचे विदयार्थांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे गुण उतरावेत, एकाग्रता वाढावी, ते किती वेळ अभ्यास करू शकतात याची मर्यादा कळावी तसेच सदरचा युवा वर्ग हा मोबाईल पासून लांब राहावा यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या अनुषंगाने **मा. श्री. अबिनाश कुमार**, पोलीस अधीक्षक नांदेड, यांचे संकल्पनेतून नांदेड पोलीस दलाकडून सलग 18 तास अभ्यास करण्याचा उपक्रम दिनांक 14.04.2025 रोजी सकाळी 06.00 ते रात्रीचे 12. 00 वाजे पावेतो पोलीस मुख्यालय, नांदेड येथे राबविण्यात येणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार जास्तीत जास्त तरूण वर्गापर्यंत जावेत आणि त्यांनी सांगितलेले शिक्षणाचे महत्व जयंती निमित्ताने पुन्हा अधोरेखित करावे या उद्देशाने हा उपक्रम मा. श्री. अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक, नांदेड यांचे नवसंकल्पांपैकी उडान कार्यक्रम अंतर्गत एक आहे आणि निश्चीतच हा उपक्रम सर्व समाजाला नविन दिशा देणारा आणि मार्गदर्शक असा होणार आहे.

तरी यावर्षी साजरी होणारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती ही विदयार्थ्यांनी नविन संकल्प करून सलग 18 तास अभ्यास करून साजरी करावी असे आवाहन **मा. श्री अबिनाश कुमार,** पोलीस अधीक्षक, नांदेड यांनी सर्व विदयार्थ्यांना केले असून सदर उपक्रमात विदयार्थी, युवक व युवती यांनी मोठया प्रमाणात सहभाग घेवुन सलग 18 तास अभ्यासाचे माध्यमातून आदरांजली देवून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची 134 वी जयंती उत्साहात साजरी करावी.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड